# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट २६४ - २३ दिनांक : - १७/०८/२०२३

**घरफोडीत चोरी गुन्हातील आरोपी अटक करुन ९.८४ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यास गुन्हे शाखा कक्ष -3 विरार यांना यश**

आर्नाळा पोलिस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक १२/०८/२०२३ रोजी विठ्ठल हेवन अपार्टमेंटच्या फ्लॅट क्र. ६०३ मध्ये कोणीही नसल्याचा फायदा घेवुन अज्ञात चोरट्याने फ्लॅटच्या बंद दरवाजाचे कुलुप तोडून फ्लॅटमध्ये करुन कपाटामध्ये असलेले सोने, चांदीचे दागीणे आणि रोख रक्कम असा १०,००,०००/- (दहा लाख ) रुपये किमतीचे दागीने व रोख रक्कम असा मुद्देमाल चोरी करून नेल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. २७७/२०२३, भा.द.वी.सं. कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिण्यापासुन दिवसा घरफोडी चोरीच्या प्रकारात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना तांत्रीक विश्लेषणाद्वारे व आरोपीत बाबत मिळालेल्या गोपणीय बातमीवरुन महिला आरोपीत नामे - मिनता वसंत राजभर, रा. डोंबीवली (प.) हिस दिनांक १६/०८/२०२३ रोजी ताब्यात घेवुन तिचेकडे तपास केला असता तिने सदर महिला आरोपीताकडुन गुन्हयातील ९,८४,०७७/- रुपये किंमतीचे सोन्याचे व चांदीचे दागीने व रोख रक्कम असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

अटक महिला आरोपीत हिला सदरचा मुद्देमाल घर फोडी चोरी करणा-या एका सराईत आरोपीताने दिले असल्याचे निष्पन्न होत असुन, सदर पाहिजे आरोपीत याचा शोध सुरु आहे.

सदर कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट-३ चे पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.नि.री. अभिजीत भुपेंद्र टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, म.सु.ब.सागर सोनवणे, गणेश यादव, प्रविण वानखडे, सर्व नेम - गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच नालासोपारा पोलीस ठाण्याचे होमगार्ड सनद क्र. ९२३५ रुपाली विलास आवाडे, व स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी केली आहे.


गुन्हे शाखा कक्ष -३
विरार
गुन्हे शाखा कक्ष -३
विरार

********